पुढारी



आजरा : बलुतेदार सन्मान ठेव पावत्यांचे वितरण करताना डॉ. अशोक सादळे, दिलीप संकपाळ, प्रा. व्ही. के. मायदेव, प्रा. डॉ. विनायक आजगेकर, डी. के. मायदेव आदी.

# 'रवळनाथ'च्या बलुतेदार सन्मान ठेव योजनेचा प्रारंभ

## उपाध्यक्ष प्रा. मायदेव; रवळनाथ हौसिंग फायनान्सचा २७ वा वर्धापन दिन

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

समाजातील सर्व सामान्य घटक असलेल्या बलुतेदारांच्या आर्थिक सन्मानासाठी व त्यांना बचतीची सवय लागावी, यासाठी संस्थेतर्फे बलुतेदार सन्मान ठेव योजना सुरू करत असल्याची घोषणा उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी केले. आजरा येथे श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या २७ व्या वर्धापनदिनानिमित्त ते बोलत होते. आजरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सादळे, उपप्राचार्य दिलीप संकपाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्ष डॉ. विनायक आजगेकर यांनी स्वागत केले.

प्रा. मायदेव म्हणाले, या योजनेंतर्गत बलुतेदारांनी कमीत-कमी अडीच हजार रुपये आणि अडीच हजारांच्या पटीत १८ महिने कालावधीसाठी गुंतवणूक करावयाची आहे. या गुंतवणुकीवर ९ टक्के व्याजदराने परतावा मिळणार आहे. ३१ मार्च, २०२४ अखेर या मर्यादित कालावधीसाठी ही योजना आहे. ठेव योजनेत सहभागी होण्यासाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अडीच लाख वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा आहे. समाजातील कुंभार, सुतार, लोहार, चांभार, तेली, न्हावी, कोळी, महार, मातंग, गुरव, परीट, माळी या बलुतेदारांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. प्राचार्य डॉ. अशोक सादळे, प्रा. दिलीप संकपाळ यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी बलुतेदार सन्मान ठेव योजनेतील ठेवीदारांना ठेवपावत्यांचे वितरण करण्यात आले. विविध मान्यवरांनी संस्थेला वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास प्रा. डॉ. किरण पोतदार, डॉ. प्रा. शिवशंकर उपासे, बसाप्पा आरबोळे, प्रा. किरण प्रधान व सभासद, कर्मचारी उपस्थित होते. बाबासाहेब मार्तंड यांनी सूत्रसंचलन केले. सीईओ डी. के. मायदेव यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Oct 28, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in